# जनार्दन स्वामी आश्रमात गुरुपौर्णिमा उत्सव भक्तीभावात साजरा

**कोपरगाव (प्रतिनिधी)**– राष्ट्रसंत सदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज आश्रम, बेट कोपरगाव येथे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तिभावात पार पडला. या पावन सोहळ्यात संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी उपस्थित राहून महंतांचे दर्शन घेत आशीर्वाद प्राप्त केला.



गुरुपौर्णिमा निमित्त आयोजित कार्यक्रमात मठाधिपती स्वामी रमेशगिरी महाराज, स्वामी माधवगिरी महाराज, १००८ महामंडलेश्वर शिवगिरी महाराज, ज्ञानानंदगिरी महाराज, साध्वी शारदानंद माता, भोलेगिरी महाराज, गणेशगिरी महाराज, दिनेशगिरी महाराज, राघवेश्वरानंदगिरी महाराज, विकासगिरी महाराज आदी संत-महंत, तसेच शिवभक्त भाऊ पाटील यांची उत्सवात उपस्थिती लाभली. बिपीन कोल्हे यांनी या सर्व संतांचे पूजन करून त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली. या निमित्ताने त्यांनी गुरुपौर्णिमेचे अध्यात्मिक महत्त्व विशद करत सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. गुरु हे जीवनातील प्रकाश आहेत, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच समाज घडतो. मूल्य टिकतात आणि श्रद्धेचा दीप सतत तेवत राहतो, असे कोल्हे यांनी सांगितले.

यावेळी जनार्दन स्वामी महाराज ट्रस्टचे अध्यक्ष बाळकृष्ण होळकर, ट्रस्टचे विश्वस्त, पंचक्रोशीतील जय जनार्दन भक्त परिवार व इतर भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तगणांनी हरिनाम संकीर्तन, कीर्तनसेवा, महाप्रसाद अशा अध्यात्मिक वातावरणात सहभागी होत गुरुपौर्णिमा सोहळ्याचा आनंद घेतला. या उत्सवाने कोपरगाव परिसरात अध्यात्म, भक्ती आणि श्रद्धेचा संगम घडवला.

कोपरगाव शहरातून गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त पूर्वसंध्येला मठाधिपती महंत रमेशगिरी महाराज यांच्या वतीने स्वामी जनार्दन प्रतिष्ठान आणि समस्त भक्तगणांच्या सहकार्याने पुष्पवृष्टी करून मिरवणूक काढण्यात आली. यासाठी संजीवनी शिक्षण संस्थेचे ट्रस्टी सुमित कोल्हे यांनी उपस्थित राहून रमेशगिरी महाराजांचे पूजन केले आणि आशीर्वाद घेतला.

# कुंभमेळ्यापूर्वी नगर ते सावळीविहीर रस्त्याचे काम होणार पूर्ण- विखे पाटील

## सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत निर्णय

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शेवगाव बाह्यवळण रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या नियंत्रणाखाली करण्याचे, तसेच कुंभमेळाच्या पुर्वी अहिल्यानगर ते सावळीविहीर रस्ताच्या काम पूर्ण करण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साविळीविहीर ते अहिल्यानगर मार्गाचे काम निर्धारीत वेळेत पुर्ण करा. मार्गाचे महत्व लक्षात घेवून कामामध्ये कोणतीही तडजोड न करता दर्जेदार कामास प्राधान्य देण्याच्या सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. नगर जिल्ह्यातील शेवगाव बाह्यवळण रस्ता तसेच सावळीविहीर ते अहिल्यानगर रस्त्याच्या कामाचा आढावा घेण्यासाठी विधान भवनात जलसंपदा मंत्री ना. विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सार्वजनीक बांधकाम विभागाचे मंत्री भोसले यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये प्रामुख्याने शेवगाव बाह्यवळण रस्ताच्या कामाच्या तयार करण्यात आलेल्या आराखड्याची माहिती अधिकाऱ्यांनी बैठकीत सादर केली. रस्ताच्या कामासाठी करावे लागणारे भूसंपादन आणि यासाठी निधी उपलब्धतेचा आढावाही घेण्यात आला. यापुर्वी या प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील आणि आ. मोनिका राजळे यांच्या पाठपुराव्यामुळे झालेल्या बैठकामध्ये या मार्गाच्या कामाचा आरखडा निश्चित करण्यात आला होता. शहरातून मराठवाड्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी २२. ६०२ कि. मी. लांबीचा या रस्ते प्रकल्पासाठी ५६.१९१ हेक्टर इतकी जमीन संपादीत करावी, लागणार असून यासाठी ८० कोटी रूपयांच्या निधीचा प्रस्ताव अर्थसंकल्पातील तरतूदीसाठी सादर करण्यात आला आल्याचे बैठकीत सांगण्यात आले. मात्र, सदरचा मार्ग दोन विभागांना जोडणारा असल्याने काम करताना मार्ग चौपदरी कसा होईल, हा दृष्टीकोन ठेवून कामाचे नियोजन करावे, आशा सूचना मंत्री विखे पाटील आणि मंत्री भोसले यांनी बैठकीत दिल्या. अहिल्यानगर ते सावळीविहीर या रस्ताच्या कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होवून कामाच्या सूचनाही निर्गमित झाल्या आहेत. सुमारे ५१५ कोटी रुपयांचा निधी यासाठी मंजूर असून कुंभमेळाच्यादृष्टीने या रस्त्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या. कामाच्या गुणवतेत कोणतीही तडजोड न करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहे.

# ‘गद्दारी’वरून शंभूराज देसाई-अनिल परब यांच्यात खडाजंगी

**मुंबई (प्रतिनिधी)**–मराठी माणसाला घर खरेदीत प्राधान्य मिळावे या मागणीवरील चर्चेदरम्यान विधान परिषदेत शिवसेना शिंदे गटाचे मंत्री शंभूराज देसाई आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार ड. अनिल परब यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. महाविकास आघाडीचे सरकार असताना असा कोणताही प्रस्ताव आला नव्हता, ही वस्तूस्थिती असून ती स्वीकारा, असे देसाई ठाकरे गटाला म्हणाले. तर त्याच सरकारमध्ये आपण मंत्री असताना गद्दारी करत होते, असा पलटवार परब यांनी केला. तेव्हा देसाई यांनी परब यांना उद्देशून तू बाहेर भेट, तुला दाखवतो, असे आव्हान दिल्यामुळे सभागृहात दोघांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. या गोंधळात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

मराठी माणसाला घर खरेदीत प्राधान्य मिळावे यासाठी कायदा करा. त्यासाठी समिती नेमा आणि मराठी माणसाला प्राधान्यांने घर मिळण्यासाठी ४० टक्क्यांची अट घालून असा कायदा आणणार का? असा प्रश्न अनिल परब यांनी विचारला. यावर शंभूराज देसाई यांनी, मराठी माणसांच्या रक्षणासाठी सरकारची भूमिका सकारात्मक आहे. परब ज्या पोटतिकडीने मराठी माणसांबद्दल भूमिका मांडत आहेत, तीच आमची भूमिका आहे. परंतु, २०१९ ते २०२२ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना तुम्ही अशा पद्धतीचे धोरण आणले नव्हते. तुम्ही करू शकला नाहीत हे स्वीकारा. तुमचे प्रेम हे पुतना मावशीचे आहे, अशी टीका देसाई यांनी केली. त्यावर पलटवार करताना महाविकास आघाडी सरकारमध्ये तुम्ही मंत्री असताना काय केले? तुम्ही झोपा काढत होता काय? असे सवाल परब यांनी केले. तेव्हा आम्ही काय करत होतो हे सांगू काय, असे शंभूराज देसाई बोलताच तुम्ही ‘गद्दारी’ करत होते, असा पलटवार परब यांनी केला.

# भिंगारचा महापालिकेतील समावेश रद्द करून स्वतंत्र नगरपालिका स्थापन होणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– शहरालगतच्या अहमदनगर (भिंगार) छावणी मंडळाचे अहिल्यानगर महापालिकेऐवजी स्वतंत्र नगरपालिका करून त्यात विलीनीकरण करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे गुरुवारी झालेल्या बैठकीत केली. यापूर्वी महसूल प्रशासनाने व काल महापालिकेने सादर केलेल्या अहवालानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे भिंगारचा महापालिकेत समावेश होण्याच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

पुणे, खडकी, औरंगाबाद, देवळाली, अहमदनगर, कामठी या छावणी मंडळांच्या लगतच्या महापालिका किंवा नगरपालिकेत समावेश करण्याबाबत विधानभवन येथे बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संग्राम जगताप, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव के.एच.गोविंदराज, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे, छावणी मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. भिंगार छावणी मंडळ परिसराचा महापालिकेत समावेश करण्यासाठी अनेक वर्षांपासून मागणी होती. मात्र, महापालिकेने जानेवारी महिन्यात ठराव करून भिंगारचा मनपात समावेश करण्यास नकार दिला होता. महापालिकेची आर्थिक स्थिती, मनुष्यबळ आदींचा विचार करता, तसेच, भौगोलिक सलगता नसल्याने भिंगारचा महापालिकेत समावेश करणे योग्य नसल्याचा अहवाल आयुक्त यशवंत डांगे यांनी बैठकीत सादर केला. यापूर्वी महसूल प्रशासनानेही असाच अहवाल दिला होता. भिंगारसह लगतच्या ग्रामपंचायतींचा समावेश करून त्यांची स्वतंत्र नगरपालिका करावी, असा अहवालही देण्यात आला होता. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वतंत्र नगरपालिका करून भिंगार छावणी मंडळाचे त्यात विलीनीकरण करण्याचा निर्णय जाहीर केला. दरम्यान, छावणी मंडळाचे संबंधित नगरपालिकेत विलिनीकरण झाल्यावर तेथील नागरी सुविधांसाठी जिल्हा नियोजनमधून निधी देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### गणेशोत्सव-महाराष्ट्राचा महोत्सव!

तक्रार करतानाच या उत्सवासाठी १०० कोटींच्या निधीची तरतूद करावी. पायाभूत सुविधांचा विकास करावा, अशी मागणीही रासने यांनी केली.

यावेळी सभागृहातच उपस्थित असलेले सांस्कृतिक मंत्री शेलार यांनी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाची देण्याची मागणी मान्य केली. १८९३ साली लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. या उत्सवाची पार्श्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वातंत्र्य स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच हा उत्सव आताही चालू आहे. महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असा हा आपला गणेशोत्सव असल्याचे शेलार म्हणाले.

जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचारासाठी महाराष्ट्र सरकार कटीबद्ध आहे. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विविध न्यायालयात यासंदर्भात मुद्दे उपस्थित करण्यात आले. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने या सगळ्या निर्बंधांना, उत्सवाच्या आड उभारण्यात आलेल्या स्पिड ब्रेकरला बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचा बाऊ करत पीओपीच्या परंपरागत मूर्त्यांवर बंदी आणण्याचा उद्योग महाविकास आघाडीच्या सरकारने केले. त्यावर, अन्य पर्यावरणपूरक पर्यायांची मांडणी करतानाच पीओपी मूर्त्यांच्या परिणामांचा सखोल अभ्यास करण्याची भूमिका सांस्कृतिक कार्य विभागाने घेतली. त्यासाठी राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार पीओपी मूर्त्या बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाल्याचे शेलार यांनी सांगितले.

आपल्या गणेशोत्सवाच्या बाबतीत महायूती सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. मुंबई, पुण्यासह राज्यातील उत्सवासाठी लागेल तेवढा निधी राज्य सरकार खर्च करेल. गणेशोत्सव उत्साहाने साजरा करणे ही महायुतीची आणि या सरकारची भूमिका आहे. सर्व गणेशोत्सव मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून आपले सैन्य, सैनिक, सामाजिक उपक्रम, ऑपरेशन सिंदूर, देशांतर्गत विकासाची कामे, आपले महापुरुष अशा सगळ्या गोष्टींच्या विचार करावा. सामाजिक भान, पर्यावरणपूरक आणि उत्साहात साजरा होणारा हा गणेशोत्सव हा महाराष्ट्र राज्याचा महोत्सव म्हणून घोषित करताना आनंद होत असल्याचे आशिष शेलार यांनी सांगितले.

### १ जुलै २०२५ पर्यंतची...

यांच्यासह विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादी वापरली जाते. १ जुलै २०२५ पर्यंत नावे नोंदविलेली यादी उपलब्धतेबाबत भारत निवडणूक आयोगाशी प्राथमिक चर्चा झाली आहे, अशी माहिती वाघमारे यांनी बैठकीत दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यी पद्धतीने घेण्यात येतात. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या वाढेल. मतदान केंद्र निश्चितीबाबत राज्य निवडणूक आयोगाने स्वतंत्र आदेशाद्वारे निकष निश्चित केले आहेत. सर्वसामान्य मतदार आणि दिव्यांग मतदारांसह सर्व घटकांचा विचार करून मतदान केंद्रांवर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी. त्याचबरोबर उपलब्ध मतदान यंत्रांचा अचूक आढावा घेण्यात यावा. आवश्यकतेनुसार पुरेशी मतदान यंत्र उपलब्ध करून देण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे सर्वोतपरी प्रयत्न सुरू आहेत, असेही वाघमारे यांनी सांगितले तर मतदान यंत्रांची प्रथमस्तरीय तपासणी तातडीने हाती घेऊन ती निवडणुकांसाठी सज्ज करण्यात यावी. त्याचबरोबर मतदान यंत्रांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना वेळीच करण्यात याव्यात. मतदान केंद्राची जागा निश्चिती, मतदान केंद्र इमारतींची स्थिती, तेथील सर्व सोयीसुविधांबाबत आतापासूनच तयारी करावी. तसेच मनुष्यबळाची उपलब्धता किंवा कमतरतेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. गरजेनुसार वेळीच मनुष्यबळ उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांशी समन्वय साधावा, असे सुरेश काकाणी यांनी यावेळी सांगितले.

### जिल्ह्यात ५७५ मतदान केंद्र वाढणार

प्रस्तावित करण्यात आली आहेत. नगर जिल्ह्यात आगामी निवडणूकांसाठी जवळपास ५७५ मतदान केंद्र वाढणार असल्याचा अंदाज निवडणूक प्रशासनाला आहे.

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर गुरूवारी दुपारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी राज्य निवडणूक आयोगाला जिल्ह्यातील आगामी निवडणुकीच्या अनुशंषाने आढावा सादर केला आहे. यावेळी जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आधी केंद्र निश्चित करा. त्यानूसार गरज भासल्यास मतदान यंत्रांची मागणी करण्यात यावी, अशी सुचना राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने करण्यात आली असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये जिल्ह्यातील मतदारांची संख्या २९ लाख ७४ हजार १८ होती. त्यानंतर मतदारांची नवीन नोंदणी वाढत आहे. १ जुलै २०२५ अखेर जिल्ह्यातील मतदारांची संख्या ३० लाख ६ हजार ८१६ झाली आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात असणाऱ्या मतदान केंद्राची संख्या ही ३ हजार १३२ होती. त्यात आता वाढ प्रस्तिावित करण्यात आली असून येणाऱ्या निवडणुकीसाठी मतदान केंद्राची संख्याही ३ हजार ७०५ होणार आहे. यासह जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे दोन गट तर पंचायत समितीचे चार गण वाढणार आहेत. कर्जत आणि जामखेड तालुक्यात जिल्हा परिषदेचा प्रत्येकी एक गट आणि पंचायत समितीचे दोन गण वाढणार आहे. इतर तालुक्यात जैसे-थे परिस्थिती राहणार आहे. भूसंपादन अधिकारी गौरी सावंत यांच्याकडे महसूल उपजिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यांच्याकडे प्रारूप मतदारसंघ तयार करण्याची जबाबदारी आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेतला जात आहे.

मतदान केंद्रावर मतदान रांगेत जास्त वेळ उभे रहावे लागत असल्याच्या कारणातून काही मतदार मतदावाकडे पाठ फिरवित आहेत. लोकसभा- विधानसभा निवडणुकीत सरासरी ५०-६० टक्केच मतदान होते. मतदारांना मतदान केंद्रावर जास्त वेळ उभे राहावे लागू नये, तत्काळ मतदानाची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने आता आठशे ते नऊशे मतदारांसाठी एक मतदान केंद्र करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. मतदान केंद्रात मतदार गेल्यानंतर अवघ्या अर्ध्या तासांच्या आत त्याची मतदानाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

**महसूल मंडलात गावांचा समावेश**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तीन वर्षांपासून रखडलेल्या आहेत. त्यामुळे इच्छुकांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे. अनेक उमेदवारांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. आपला मतदारसंघ गृहित धरून गावातील सुख-दुःखाच्या प्रसंगात उमेदवार हजेरी लावत आहेत. आपल्याला अनुकूल असलेल्या गावे इतर मतदारसंघात जाऊ नये, यासाठी ही गावे जवळच्या महसूल मंडलाला जोडावीत, असे पत्र महसूल प्रशासनाला देत आहेत.

**१४ तारखेला प्रारूप प्रभाग रचना**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी सध्या प्रारूप मतदारसंघ तयार करण्याचे काम सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १४ जुलै रोजी जिल्हा परिषद व पंचायत समित्याचे प्रारूप मतदारसंघ जाहीर केला जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**मतदान यंत्राची उपलब्धता**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी जिल्ह्यात ३ हजार ५९७ कंट्रोल युनिट, २ हजार १७६ बॅलेट युनिट, १ हजार ६६८ मेमरी चिप्स उपलब्ध आहेत. जिल्ह्यासाठी आणखी ४७८ कंट्रोल युनिट, १ हजार ८९९ बॅलेट युनिटची गरज असल्याचे सांगण्यात आले. ही यंत्रे अन्य जिल्ह्यातून राज्य निवडणूक आयोग उपलब्ध करून देणार असल्याचे सांगण्यात आले.

### गोगलगावात पती-पत्नीचा गूढ मृत्यू

खळबळ उडाली. गावापासून जवळच सादतपूर हद्दीत गायकर वस्तीवर राहणारे रेवजी गायकर हे शिक्षण संस्थेत नोकरीत होते. पत्नी, एक मुलगा, तीन मुली असे त्यांचे कुटुंब. चारही मुलांचे विवाह झाले. मुली त्यांच्या सासरी गेल्या तर मुलगा नोकरीसाठी संभाजीनगरला गेला. घरी पती-पत्नी दोघेच होते. रेवजी यांनी तीन वर्षे आधीच स्वेच्छानिवृत्ती स्वीकारत नोकरी सोडली. त्यांना पेन्शनही मिळू लागली. पोटापुरती शेती असल्याने दोघे शेतातील कामे करून चांगले जीवन जगत होते.

त्यांची एक मुलगी निमगावजाळी ता. संगमनेर येथे सासरी राहाते. तिने गुरुवारी सकाळपासून अनेकदा आई-वडिलांना मोबाईलवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण प्रतिसाद मिळाला नाही. शेवटी तिने जवळच राहणाऱ्या चुलत भावाला संपर्क साधून विचारणा केली. चुलत भाऊ रेवजी यांच्या घरी गेला असता दरवाजा अर्धवट उघडा दिसला. आवाज देऊनही काहीच प्रतिउत्तर न आल्याने दरवाजा पूर्ण उघडून बघितले असता रेवजी जमिनीवर पडलेल्या अवस्थेत आणि त्यांच्या तोंडातून फेस आलेला बघून त्याने आजूबाजूच्या लोकांना बोलावले. राहाता तालुका दूध संघाचे उपाध्यक्ष त्र्यंबक गायकर घटनास्थळी पोहचले. परिस्थिती लक्षात येताच त्यांनी आश्वी पोलिसांना कळवले.

दरम्यान, रेवजी यांच्या पत्नी नंदा यांचा शोध घेण्यास सुरुवात केली असता, घराजवळच त्यांच्या शेततळ्यात नंदा यांचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी दोन्ही मृतदेहांचा घटनास्थळी पंचनामा करून ते प्रवरा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले. रात्री उशिरा दोन्ही मृतदेहांवर गोगलगाव येथील स्मशानभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले. घटनेने गोगलगावमध्ये शोककळा पसरली आहे. काही दिवसांपूर्वीच याच गावात दोन भावांचा ओढ्याच्या पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. रेवजी व नंदा यांचा मृत्यू कशामुळे झाला हे सध्या कुणीच सांगू शकत नाही. रेवजी यांच्या तोंडातून फेस आल्याचे दिसून आल्याने त्यांनी विष प्राशन केले की त्यांना कुणी पाजले, हे तपासात समोर येईल. नंदा यांचा मृतदेह शेततळ्यात आढळल्याने त्या पाय घसरून पडल्या की त्यांचा घातपात झाला, याचाही तपास आश्वी पोलिसांना करावा लागणार आहे. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

### पीक विम्याची ३७९ कोटींची...

माणिकराव कोकाटे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने याबाबत प्रशासकीय पातळीवर आढावा घेत प्रस्ताव वित्त विभागाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविला होता. या प्रस्तावास वित्त विभागाकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर राज्य सरकारने राज्य विमा हप्त्याचे १ हजार २८ कोटी ९७ लाख रुपये मंजूर केले. त्यामुळे केंद्र सरकारच्या पीक विमा पोर्टलद्वारे सदर कार्यवाही पूर्ण होईल. कृषी मंत्र्यांच्या सजगतेमुळे आता पीक कापणी प्रयोग आधारित नुकसान भरपाई आणि काढणी पश्चात नुकसानभरपाईचे प्रलंबित ३७९ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा कंपनीमार्फत जमा होतील. याबाबत शेतकऱ्यांना काही अडचणी आल्यास आपल्या विभागाशी थेट संपर्क करण्याचे आवाहन कोकाटे यांनी केले आहे.

### गटारीचे काम करताना गुदमरुन...

वायूच्या संपर्कात आल्याने गुदमरुन दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. काल (गुरुवारी) दुपारी ही दुर्घटना घडली.

अतुल रतन पवार (वय १९) व रियाज जावेद पिंजारी (वय २२) असे या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या मजुरांची नावे आहेत. संगमनेर नगरपालिकेने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत शहरात भूमिगत गटारांचे जाळे टाकण्याचे काम सुरू केले आहे. गुरुवारी कोल्हेवाडी रस्त्यावरील कामाच्यावेळी एका कामगाराला श्वास घेण्यास त्रास होवू लागला. त्याला वाचवण्यासाठी धावलेल्या काही कामगारांचा आणि नागरिकांचाही गटारात श्वास कोंडला. यामुळे एकच गोंधळ उडाला.

या घटनेची माहिती मिळताच शहराचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, पोलीस अधिकारी व अग्निशन दलाचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य राबवले. गटारात बेशुद्ध पडलेले अतुल रतन पवार (वय १९, रा. संजय गांधीनगर, संगमनेर), रियाज जावेद पिंजारी (वय २२) व आणखी एक या तिघांना तातडीने बाहेर काढून रुग्णालयात हलवले. यातील अतुल पवार याचा उपचारापूर्वी तर रियाज पिंजारी याचा खासगी रुग्णालयात उपचारदरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत थोरात यांनी तातडीने पोलिसांत धाव घेऊन दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

**ठेकेदारावर गुन्हा दाखल करा : आ. खताळ**

♦ कोल्हेवाडी रस्त्यावरील भूमिगत गटारीचे काम सुरू असताना दोन कामगाराचा गुदमरून मृत्यू झाला. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे अतुल रतन पवार व रियाज पिंजारी या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत.

**–अमोल खताळ (आमदार, संगमनेर)**

### महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक...

यांनी काल यासंदर्भातील विधेयक विधानसभेत सादर केले. त्यावेळी फडणवीस यांनी विधेयकामागील राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली तसेच विधेयकाच्या संदर्भातील शंकांचे निरसन केले. विरोधी पक्षाचा आवाज दाबण्यासाठी हा कायदा नाही. या कायद्यामुळे कोणत्याही आंदोलनावर गदा येणार नाही, असा निर्वाळाही त्यांनी दिला.

कुणाला त्रास देण्यासाठी हा कायदा आणलेला नाही. या कायद्याच्या अंतर्गत कोणत्याही व्यक्तीला, राजकीय नेत्याला अथवा पत्रकाराला थेट अटक केली जाणार नाही. तर संघटनांवर कारवाई करून बंदी घातली जाणार आहे. बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचा एखादा व्यक्ती सदस्य असल्याचे सिद्ध झाले तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. संविधानाच्या विरोधात ब्रेनवॉश करणाऱ्या संघटनांवर कारवाई करण्यास सध्याच्या कायद्यात जागा देत नाही.त्यामुळे हा कायदा ही काळाची गरज आहे. या कायद्याच्या मागे कोणतीही राजकीय भूमिका नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

फडणवीस यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारने बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष माओवादी संघटनेचे उदाहरण दिले. या संघटनेची घटना आणि घटनेतील उद्दिष्ट वाचून दाखवत त्यांनी देशासमोरील धोका स्पष्ट केला. माओवादी संघटनेला देशात चीनसारखी व्यवस्था उभी करायची आहे. त्यामुळे संविधानाने उभी राहिलेली व्यवस्था ज्यांना मान्य नाही, अशा संघटनांच्या विरोधात हा कायदा आहे. तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओडिसा, झारखंड या राज्यांनी यापूर्वी असा कायदा केला आहे. केंद्र सरकारने नक्षलवादाचा वावर असलेल्या सर्व राज्यांना असा कायदा करण्यास सांगितला आहे. या कायद्यामुळे आंध्रप्रदेश, झारखंड, तेलंगणा या राज्यातील काही संघटनांवर बंदी आली. महाराष्ट्रात कायदा नसल्यामुळे शेजारच्या राज्यातील ज्या संघटनांवर बंदी आहे, अशा संघटना महाराष्ट्रात कार्यरत आहेत आणि त्यांची संख्या ६४ इतकी आहे. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, गडचिरोली, अमरावती, बीड येथे या सक्रिय आहेत, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

या कायद्याच्या अंतर्गत दोषी ठरणाऱ्या संघटना आणि व्यक्तींवर कारवाईची प्रक्रिया कशी असेल हेही मुख्यमंत्र्यांनी यांनी सविस्तरपणे सांगितले. एखादी संघटना संविधानाने निर्माण झालेल्या व्यवस्थेच्या विरोधात काम करत असल्याचे लक्षात आले तर तसे अधिसूचित करून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, जिल्हा न्यायाधीश आणि सरकारी वकील यांच्या प्राधिकरणापुढे जावे लागेल. प्राधिकरणासमोर संघटनेच्या पुरावे सादर केले जातील. जर प्राधिकरणाने पुरावे योग्य ठरवले तर अधिसूचना काढून संघटनेवर बंदीची आणि संघटनेचे सदस्य असलेल्या व्यक्तींवर अटकेची कारवाई केली जाईल. कुणालाही उचलून आत टाकले जाणार नाही. ज्यांच्यावर कारवाई होईल त्यांना या कारवाईच्या विरोधात उच्च न्यायालयात दाद मागणीसाठी एक महिन्याची मुदत मिळणार आहे. त्यामुळे सरकारच्या कारवाईची उच्च न्यायालयाकडून छाननी होणार आहे, असे फडणवीस म्हणाले.

विधेयक मंजूर होण्यापूर्वी विरोधी पक्षाने विधेयकाबाबत शंका उपस्थित केल्या. जर हा कायदा संपूर्ण देशासाठी आहे तर भाजपशासित अन्य राज्यात असा कायदा का नाही? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांनी केला. तर नक्षली चळवळीला आपल्या पक्षाचा विरोध असल्याचे सांगत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे जयंत पाटील यांनी विधेयकाला पाठिंबा दिला. मात्र, या कायद्याच्या नावाखाली इतरांना त्रास होऊ नये आणि त्याचा गैरवापर होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त केली. केंद्रात युपीए सरकार असताना तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी पीएमएलए कायदा आणला आणि युपीएचे सरकार गेल्यानंतर त्यांच्यावर या कायद्याच्या अंतर्गत पहिली कारवाई झाली, याकडे पाटील यांनी लक्ष वेधले. यावेळी काँग्रेसच्या नितीन राऊत, रोहित पवार यांनीही आपले विचार मांडले. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या विनोद निकोले यांनी या विधेयकाला विरोध केला.

> ▶ ज्या संघटनांना राज्यघटना, संसद, लोकशाही व्यवस्था मान्य नाही. ज्यांना ही व्यवस्था उलथून टाकायची आहे आणि त्यासाठी हिंसाचार घडवायचा आहे, अशांना पायबंद घालण्यासाठी हा कायदा आहे. या कायद्यामुळे कुठलेही आंदोलन करण्याचा किंवा सरकारविरोधात बोलण्याच्या अधिकारावर गदा येणार नाही
>
> **–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**